# वृत्तपत्र जाहीरात
# "दैनिक सकाळ"
# दिनांक -२२/०२/२०२२

MAHARASHTRA

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

### पर्यावरणविषयक जाहीर सुनावणीची सूचना

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी जालना जिल्ह्यातील अंबड, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद, बदनापूर, घनसावंगी तालुक्यातील प्रस्तावित वाळू घाटांच्या पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्ताव दाखल केला आहे. भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्र. एस.ओ. १५३३ दि. १४/०९/२००६ (दिनांक १/१२/२००९ सुधारीत) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे. सदर वाळूघाटाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणविषयी काम करणाऱ्या संस्था, विस्थापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सूचना, टिका-टिप्पणी लेखी स्वरुपात नोंदविता येतील. लेखी स्वरुपात सूचना ही जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर अथवा इ-मेलवर पाठविण्यात याव्यात.

**उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
**प्लॉट नं. पी-३/१ व पी-३/२, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना.**
**ई-मेल - srojalna@mpcb.gov.in**

सदर सुनावणी कोविड-१९ नियमावलीचे पालन करून घेण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणविषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्यप्रकारे प्रभावीत होणारे रहिवासी लोकसुनावणीमध्ये आपला सहभाग नोंदवू शकतात. सदर लोकसुनावणीचे ठिकाण, दिनांक व वेळ खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| सुनावणीचे ठिकाण | :- | **डी.पी.डी.सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.** |
| सुनावणीची तारीख | :- | २३/०३/२०२२. |
| सुनावणीचे वेळ | :- | **सकाळी ११.३० वा.** |

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तावेज (इंग्रजी व मराठी) मध्ये खालील कार्यालयांमध्ये तसेच www.mpcb.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. संबंधीत व्यक्ती खालील कार्यालयामध्ये सदर कागदपत्रे कार्यालयीन वेळेत अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
२. जिल्हा उद्योग केंद्र, जालना.
३. जिल्हा परिषद, जालना.
४. तहसिल कार्यालय, तालुका- अंबड, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद, बदनापूर, घनसावंगी.
५. ग्रामपंचायत कार्यालय, तालुका- अंबड- चांभारवाडी, झोडेगाव, हसनापूर, बढाण खु., धुंगर्डे हदगाव, पिठोरी सिरसगाव, दाढेगाव. तालुका- मंठा- भुवन, देवठाणा- उस्वद १, देवठाणा- उस्वद २, टाकळखोपा-दूधा, कानडी-उस्वद २, कानडी-लिंबखेडा. तालुका-भोकरदन- मेरखेडा, देऊळगावताड. तालुका- जाफ्राबाद- टाकळी, गारखेडा, आरदखेडा-वरखेडाविरो, बोराखेडी गायकी-गारखेडा. तालुका- बदनापूर- कडेगाव, ढासला, नाणेगाव, सायगाव. तालुका- घनसावंगी- अंतरवाली टेंभी, गुंज सिरसवाडी.
६. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, प्लॉट नं. पी-३/१ व पी-३/२, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना.
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, भूखंड क्र. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा औरंगाबाद.
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलसमोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
९. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हिल लाईन, नागपूर.

स्वाक्षरित
**(सो. म. कुरमूडे)**
उप-प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना